रयत शिक्षण संस्थेचे,

**आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)**

2018-19

# आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त महाविद्यालयात व्याख्यानाचे व चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. दिनांक 8 सप्टेंबर 2018 रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिना निमित्त महाविद्यालया मध्ये लिटरसी अँड स्किल डेवलपमेंट, साक्षरता आणि कौशल्य विकास या विषयावर कॉमर्स विभागाचे प्राध्यापक बी.डी. पाटील यांनी साक्षरतेचे महत्त्व व आधुनिक काळातील विविध कौशल्य विकासावर आधारित उपक्रमांची माहिती आपल्या व्याख्यानातून दिली. साक्षरतेतून व्यक्तीचा विकास कसा होईल, भविष्यात येणाऱ्या नवीन संकल्पना, प्रसार कसा होईल यावर त्यांनी माहिती दिली. साक्षरता दिनानिमित्त चर्चासत्रांमध्ये सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी केले. या कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयातील यांची एन.सी.सी.विभाग,एन.एस.एस. विभाग यांनी संयुक्तरित्या केले व्याख्यानासाठी उपस्थित ६० विद्यार्थी- विद्यार्थिनी, १५ शिक्षक शिक्षकेतर सेवक कर्मचारी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन 8 सप्टेंबर 2018







तरुण भारत शुक्रवार, २८ सप्टेंबर २०१८

## साक्षरता, कौशल्य विकास विषयावर व्याख्यान

पलूस : प्राध्यापक बी. डी. पाटील यांनी डिजिटल भाषेतून साक्षरतेचे महत्व पटवून दिले.

प्रतिनिधी
पलूस

रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेचे आर्ट्स सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज मध्ये आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापक बी डी पाटील यांचे साक्षरता आणि कौशल्य विकास या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी साक्षरता याबद्दल डिजिटल भाषेतून साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले. तसेच विविध प्रकारचे कौशल्य विकास आधारित माहिती विद्यार्थ्यांना दिली या कार्यक्रमाचे संयोजन ए.एस. सी कॉलेज रामानंदनगरमध्ये करण्यात आले प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रमाचे संयोजन एनसीसी विभाग व एनएसएस विभाग यांनी संयुक्तरित्या केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. मोहन चव्हाण होते. तर सूत्रसंचालन श्रीमती संध्या माने यांनी केले.

